# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १८/०२/२०२१

## मा. विशेष स्थायी समिती सभा
## सभा सूचना क्र. ०९

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ........................................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा बुधवार दि. २४/०२/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिनी सभा सुचना क्र. ०९ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. पिठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :-

१) निवडणूक कार्यक्रम
२) नामनिर्देशन पत्र

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. २४/०२/२०२१ सभा सुचना क्र. ०९ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ७८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची एक वर्षाकरीता सभापती स्थायी समिती म्हाणून नेमणूक करणेबाबत. |

दिनांक :- १८/०२/२०२१

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बुधवार दि. २४/०२/२०२१ रोजी होणाऱ्या मा. स्थायी समिती सभापती पदाकरिता निवडणूक कार्यक्रम

| वार व दिनांक | तपशिल |
|---|---|
| मंगळवार<br>दि. २३ फेब्रुवारी २०२१<br>(सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत) | मा. स्थायी समिती सभापती पदाचे नेमणूकीकरीता नामनिर्देशन पत्र विहित नमुन्यात महानगरपालिका सचिवांकडे कार्यालयीन वेळेत दाखल करणे. |
| बुधवार दि. २४ फेब्रुवारी २०२१ (सकाळी ११.३० वाजता किंवा सभा सुरु झाल्यापासून) | प्रत्यक्ष सभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर,<br>१) बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे असतील.<br>२) स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी व उमेदवारी मागे घेणे.<br>३) कोणत्याही उमेदवारास पुर्ववर्ती पोटनियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नाव वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत त्याने सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकाऱ्यांकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.<br>४) पिठासीन अधिकारी उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे सदस्यांस वाचून दाखवतील.<br>५) स्थायी समिती सभापती पदाचे निवडणूकीसाठी आवश्यकता भासल्यास मतांची नोंद हात वर करुन घेण्यात येईल.<br>६) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पिठासीन अधिकारी निकाल घोषित करण्याची कार्यवाही करतील. तद्नंतर उमेदवारांनी मिळविलेल्या मतांच्या संख्येनुसार चढत्याक्रमाने उमेद्वाराची यादी तयार करतील. ज्या उमेद्वाराला मतदानात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याची घोषणा करण्यांत येईल.<br>७) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषित करतील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे सोडविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहूसंख्येने ठरवतील अशा व्यक्तींकडून चिठ्ठी काढण्यात येईल.<br>८) ज्या उमेदवाराच्या नावाने चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैधरितीने निवडून आला असल्याचे घोषित करण्यांत येईल. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सचिव कार्यालय,
तिसरा मजला, मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.)
दिनांक :- १८/०२/२०२१